(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. X / Issue – I ISSN 2277-8063

# आधुनिक भारताच्या शेती उत्पादन वाढीत पंडीत जवाहरलाल नेहरू यांचे योगदान

**संजय कुबल,** संशोधक विद्यार्थी राज्यशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

---

प्रस्तावना :—

भारतावर इंग्रजांनी १५० वर्षे राज्य केले. या कालावधीत भारतातील उद्योगधंदे, कुटिरउद्योग, स्थानिक उद्योग, गावपातळीवरील उद्योग व्यवस्था पूर्ण मोडकळीस आली. भारतातील शेती व्यवस्थेमध्ये कोणतीही सुधारणा न होता ती लयास गेली होती. भारत स्वतंत्र झाल्यावर सामाजिक व आर्थिक विषमता, निरक्षरता, अन्नधान्याची टंचाई, बेकारी, दरिद्र व निरक्षरता हे मोठे प्रश्न होते. नेहरू स्वतंत्र भारताचे पहीले पंतप्रधान झाल्यावर त्यांच्यापुढे या सर्व समस्या सोडविण्याचे आव्हाण होते. नवभारत नवा समाज निर्मितीसाठी ठोस योजना राबविणे आवश्यक होते. अशा परिस्थितीत फार मोठया अपेक्षेने कृतीशील नेतृत्व म्हणून नेहरूंकडे पाहिले गेले.

भारतीय समाजात समाजवाद, लोकशाही, धर्मनिरपेक्षता या मुल्यांना रूजविण्याचे काम त्यांनी केले. भारताच्या नियोजनबद्ध आर्थिक विकासाची गरज त्यांना समजली होती आणि त्यासाठी भारतातील शेती विकासासाठी आवश्यक गरजा पूर्ण करणे हे त्यांनी धेय्य ठेवले. त्यासाठी पाण्याचे व्यवस्थापण (लहान—मोठी धरणे, जल प्रकल्प), उर्जा उत्पादन, नितरण, दळणवळण व शेतीचे आधुनिकीकरण याबाबत नियोजन केले आणि शेती प्रगतीचे पहीले पाउल पडले. आज देशाने जी शेती उत्पादनामध्ये प्रगती केली आहे त्याचे श्रेय निश्चितच नेहरूंचे आहे.

Keywords — योगदान, शेतीविषयक, विकास

**संशोधनाचा उद्देश:—**

१. पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या शेती विषयक धोरणांचा आढावा घेणे.
२. भारताच्या शेतीविषयक नियोजन व विकास याबाबत नेहरू यांची भूमिका अभ्यासने
३. भारताचा अन्नधान्य वाढीसाठी शेतीबाबतचा नेहरू यांचा दृष्टीकोन अभ्यासणे.
४. आधुनिक भारताच्या शेतीबाबत नेहरूंचे योगदान अभ्यासणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत विषयावर संशोधन करताना वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन करण्याचा आढावा घेण्यात आला.

नेहरूंचे शेतीविषयक योगदान अभ्यासताना त्यांचे राज्याबाबतचे विचार अभ्यासणेही आवश्यक आहे.

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मते राज्य हे लोकहीतवादी असून त्यांची आधारभूत तत्वे म्हणजे सर्वांना समान संधी, गरीब व श्रीमंत यांच्यातले अंतर मिळून त्याचा जीवनमान उंचावणे हा होय.

नेहरू हे राज्य विरहीत समाज ही संकल्पना मानत नाहीत. त्यांच्या मते समाजातील व्यक्तिंच्या भौतिक व आर्थिक समृध्दी समाज जिवनातील शांतपूर्ण व्यवस्था दाखविणारी राजकीय संस्था म्हणजे राज्य होय. काही स्वातंत्र आणि आर्थिक विकास हे आदर्श राखणे हे राज्याचे कर्तव्य आहे. त्यांनी लोकशाही व तसेच लोक कल्याणकारी राज्य असावे असे प्रतिवादन केले आहे. त्यांनी राजकीय लोकशाही आर्थिक लोकशाहीला पूरक म्हणून जोडली पाहीजे असे प्रतिवादन केले आहे.

भारत स्वतंत्र झाल्यावर देशासमोर असलेली भयावह स्थिती म्हणजे भारताचा शेतीची परिस्थिती व शेतीचे उत्पन्न याबाबी विचारात घेवून ही राष्ट्रिय समस्या सोडविण्यासाठी व देशाचा विकास जलदगतीने करण्यासाठी त्यांनी देशाचे एकमत तयार केले. नेहरूंच्या पंतप्रधान पदाच्या कालावधीमध्ये भारतात मुख्य व्यवसाय हा शेती होता. भारतात शेती पध्दतीही पारंपारिक होती व नियोजनाचा अभाव होता त्यासाठी त्यांनी ठोस उपाय योजना आमलात आणल्या.

**पंचवार्षिक योजना:—**

सोवनित रशीया यांनी जी प्रगती केली त्याचा प्रभाव नेहरूंवर होता. रशीयाने आर्थिक नियोजनाच्या आधारे अतिशय अल्प कालावधीत केलेल्या विकासाचा अभ्यास करून रशीयाप्रमाणे आर्थिक नियोजन करण्याचा निर्णय नेहरूंनी घेतला व त्यानुसार १९५० मध्ये नियोजन आयोगाची स्थापना केली व पंचवार्षिक योजनांचे नियोजन केले. या योजनामध्ये खालील बाबींचा समावेश केला.

१. नियोजन पदवतीमध्ये बदल करून माणूस व खेडेगांव मुख्य घटक मानला.
२. उजाड क्षेत्र उत्पादनमय बनविणे यासाठी ग्रामीण भागाचा विकास.
३. गावातच व्यवसाय व जिवनावश्यक गरजा उपलब्ध करून देणे.
४. शेत मालाला किफायतशिर भाव देणे.
५. आरोग्य, शिक्षण, अन्नधान्य, कपडा, पिण्याचे पाणी, उर्जा, दळणवळण या मुलभूत गरजा रास्त दरात पुरविणे व ही जबाबदारी शासनाने स्विकारावी व त्यासाठी खास नियोजन करणे.
६. आर्थिक व सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी साम्यवादी व इतर देशातील धोरणाचा अभ्यास करून त्याचा स्विकार.
७. लोकसंख्या वाढीवर नियंत्रण.
८. शिक्षण व सहकार क्षेत्र राजकारणापासून पूर्ण मुक्त करणे.
९. भ्रष्टाचार व काळाबाजार यावर ठोस उपाय.
१०. शाळा, ग्रामीण भागात सुविधायुक्त इस्पितले, छोटे मोठे बंधारे यासारखे उपक्रम.
११. ग्रामीण भागात मोठया प्रमाणात नोकरी देणारे व्यवसायांचे नियोजन करणे.
१२. अतिरिक्त जमिनी विविध विकास कामाना देणे किंवा जमिनीचे शेतकामाला पूर्नवाटप करणे.

**निष्कर्ष:—**

१. आधुनिक भारताच्या शेती विकासास नेहरूंचे योगदान आहे.
२. आधुनिक भारताने शेती उत्पादनात केलेली उच्चतम कामगीरी ही नेहरूंच्या शेतीविषयक धोरणांचा परिपाक आहे.
३. पंडीत नेहरू हे भारताच्या शेती व्यवस्थेच्या सुधारणाचे जनक आहेत.
४. पंडीत नेहरूंनी शेती समृध्दीसाठी पाणी व्यवस्थापन व उर्जा उत्पादनांची वाढ याचा पाया घातला.
५. शेती पुरक सुधारणांसाठी नेहरूंचे धोरण व नेतृत्व महत्त्वपूर्ण ठरले.

**संदर्भ सुची:—**

१. डॉ. भोले भास्कर लक्ष्मण, भारतीय राजकीय विचारवंत, विंदलपुरे ॲण्ड कंपनी, पब्लिशर्स, नागपूर, पाहीली अवृत्ती जुन १९९५, प्र.क्र. १७२
२. प्रा. वडारकर र. घ., भारतीय राजकीय विचारवंत, विद्याप्रकाशन, नागपुर, पुर्नमुद्रण २००५ प्र.क्र. २४, ३८
३. प्रा. पळशीभर रेखा, प्रा. देवळणक शैलेंद्र, स्वतंत्र भारतीय राजकीय विचारवंत, यशवंतराव मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्रगत प्रकाशन २००२, प्र क्र. १२
४. डॉ. पाटील वा. भा. आधुनिक भारतीय राजकीय विचारवुंत, जळगांव, प्रशुांत पब्लिकेशन, २००९ प्र. क्र. १८६, १८७